साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु

**प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस**

३८. मारुती गार्डे यांचे मृत्युसमयी बँक ऑफ महाराष्ट्र येथे खाते होते. त्यावेळी त्या खात्यात किती रक्कम शिल्लक होती या बाबत मला सांगता येणार नाही. त्यांच्याकडे त्यावेळी रोख रक्कम अथवा दागिने नव्हते. बँक खात्याच्या पासबुकनुसार देखील मारुती यांच्या कडे कोणतीही रक्कम शिल्लक नव्हती. दिनांक ०६.०४.२०१६ रोजी मी मारुती गार्डे यांच्या सह एक खरेदीचा दस्त नोंदवुन घेतला होता. सन २०१६ मध्ये त्यांचे वय ७९ वर्षे होते. सदर दस्तामध्ये त्यांचे वय ७९ वर्षे असेच लिहले होते. तसेच त्या दस्तामध्ये त्यांचा व्यवसाय शेती असल्याचे नमुद केले होते. त्यांच्या शेतीपासुन त्यांना मिळणारे उत्पन्न त्यांच्या कडेच होते. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे यांच्या मृत्युसमयी त्यांच्या बँक खात्यामध्ये हजार रुपयांपेक्षा कमी रक्कम शिल्लक होती. सन १९९५ सालापासुन मारुती गार्डे यांना दरसाल १ लाखा पर्यंतचे उत्पन्न शेतीतुन मिळत होते.

३९. मारुती गार्डे व त्यांच्या मुलीमध्ये सन २००५ पासुन न्यायालयीन प्रकरणे सुरु झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सन २००५ पासुन ते सन २०२० पर्यंत मारुती गार्डे यांच्याकडे १५ लाखापर्यंतचे शेतीचे उत्पन्न होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सन २००५ नंतर कधीही त्यांना आमच्या आर्थीक मदतीची गरज पडली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना मिळालेले उत्पन्न संपुर्णतः त्यांच्याच कडे होते. हे म्हणणे खरे आहे की,त्यांना त्या उत्पन्नातुन त्यांच्या पत्नी करिता व मुलीकरिता खर्च करण्याचा कोणताही प्रसंग आला नव्हता. सन २०१६ सालच्या खरेदी व्यवहाराच्या वेळी मारुती गार्डे यांनी तसेच आम्ही सुध्दा त्यांच्या मुलीची म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ची संमती घेतली नव्हती. मारुती गार्डे काशी, गंगोत्री, हरिद्वार व रामेश्वर अशा तिर्थस्थानी गेल्याचे दर्शविण्याकरिता माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा तसेच फोटो नाही. हे म्हणणे खरे आहे की, मारुती हे काशी, गंगोत्री, हरिद्वार व रामेश्वर येथील तीर्थस्थानी कधी गेले नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०८.०४.२०१६ रोजीच्या खरेदी दस्ताच्या अनुषंगाने मी मारुती गार्डे यांना रक्कम रुपये ८,५२,०००/- अदा केली असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. माझ्याकडे मात्र त्यावेळी तेवढी रक्कम होती असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा आहे. त्यावेळी माझ्या तसेच माझा भाऊ दिलीप यांच्या सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक तसेच महाराष्ट्र बँक येथील खात्यात तेवढी रक्कम जमा होती. त्यावेळी आम्हा दोघांच्याही खात्यात एकुण १२ लाखापर्यंत रक्कम जमा होती. आम्ही भाऊ त्यावेळी एकत्रात रहायचो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दोघाही भावडांनी मारुती गार्डे यांना फसवले होते. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र मारुती दानवले हा आमच्या प्रत्येक दस्तावर साक्षीदार म्हणुन हजर असायचा. हे म्हणणे खरे आहे की, वादातील मृत्युपत्र व खरेदीखत या दोन्ही दस्ताच्या वेळी सदरील रामचंद्र हजर होता.

४०. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे त्यांची पत्नी, मुलगी तसेच आम्ही भावंडे व आमचे वडील यांच्यातील सर्व प्रकरणांमध्ये मारुती यांची पत्नी खाशीबाई तसेच मुलगी मंगल यांनी सतत मारुती गार्डे यांची सन २००५ पासुन मनस्थीती बिघडली आहे असे कथन केले होते. साक्षीदार सांगतो की ते खोटे कथन आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसे कथन खोटे असल्याचे दर्शविण्याकरिता सन २००५ व २००६ मध्ये मारुती गार्डे यांची वैद्यकीय तपासणी झाल्याचे दाखविण्याकरिता माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदार सांगतो की, बाबर हॉस्पीटल वाई व सातारा सिव्हील हॉस्पीटल येथील मारुती यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यांचा निश्चीत कालावधी मला आजरोजी सांगता येणार नाही. मी त्या तपासणीच्या वेळी मारुती यांच्या सह हजर होतो. त्यावेळी मी, माझा भाऊ व वडील त्यांना दवाखान्यात घेवुन गेलो होतो. सदरचे प्रमाणपत्र मारुती गार्डे यांचे मृत्युपत्र करण्याकामी प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र मी, माझा भाऊ व वडील यांनी प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की, खाशीबाई यांनी त्यांच्या दाव्यात मारुती गार्डे यांनी प्रत्यक्ष हजर रहावे या आशयाचा अर्ज दिला होता. त्याप्रमाणे मारुती त्या दाव्यात हजर राहिल्याचे मला सांगता येणार नाही.

**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**

४१. मारुती गार्डे यांना शिवाजी, कृष्णात, आनंदराव व लक्ष्मण अशी भावंडे होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ मध्ये खाशीबाई गार्डे यांनी मृत्युपत्र केले होते व ते त्यांची मुलगी मंगल हिने ग्रामपंचायत कार्यालयात वारस नोंदीकामी दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मंगल व तिचे आई वडील म्हणजेच खाशीबाई व मारुती यांच्यात वाटप झाले नव्हते.

***प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.09.18 16:30:11 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- १८/०९/२०२५ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.